| | |
|---|---|
| CNR NO.MHDH060000342025 | खटला दाखल तारीख : ०९.०१.२०२५<br>खटला नोंदणी तारीख : ०९.०१.२०२५<br>खटला निकाल तारीख : १७.०८.२०२६<br>निकालाचा कालावधी : ०१ व. ०७ म. ०८ दि. |

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, शिंदखेडा जि. धुळे यांचे न्यायालयात,**
**(पीठासन अधिकारी : एल. पी. धन्वे)**

**नियमित फौजदारी खटला क्र. ८/२०२५**
**निशाणी क्र. ३४**

**न्यायनिर्णय दिनांक : १७.०८.२०२६**
प्रथम खबरी अहवाल क्रमांक २१५/२०२४, शिंदखेडा पोलीस स्टेशन

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | .. | महाराष्ट्र शासन<br>(तर्फे– पोलीस निरिक्षक, शिंदखेडा पो. स्टे.) |
| सरकार पक्षातर्फेः– | .. | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. जी. एम. बागूल |
| आरोपींचे नाव | .. | १. गणेश अरुण तिडके,<br>वय – ३५ वर्षे, धंदा – शेती,<br><br>२. पुष्पा अरुण तिडके,<br>वय – ५८ वर्षे, धंदा – शेती,<br>आरोपी क्र. १ व २ रा. मु. पो. आंबेगण,<br>ता. दिंडोरी, जि. नाशिक<br>ह. मु. मखमलाबाद, नाशिक<br><br>३. चंदा संतोष वाघ,<br>वय – ३० वर्षे, धंदा – शेती,<br><br>४. संतोष भास्कर वाघ,<br>वय – ३५ वर्षे, धंदा – शेती,<br>आरोपी क्र. ३ व ४ रा. मु. पो. जानोरी,<br>ता. दिंडोरी, जि. नाशिक |
| आरोपी पक्षातर्फेः– | .. | श्री. आर. ए. पगारे वकील |

## Part 'B'

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | दिनांक ०६.०४.२०१८ रोजी फिर्यादीचे लग्न झाल्याच्या काही दिवसानंतर ते दिनांक २९.०६.२०२४ पर्यंत. |
| प्रथम खबरी अहवालाची तारीख | १९.०७.२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची तारीख | ०९.०१.२०२५ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | ०३.०६.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १८.०७.२०२६ |
| ज्या दिवशी निकाल राखून ठेवला ती तारीख | लागू नाही |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख जर असेल तर ती तारीख | लागू नाही |

## -:आरोपीचा तपशिल:-

| आरोपी क्र. | नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | गुन्हा कलम | निर्दोष सुटल्याची तारीख | शिक्षा ठोठावली | फौ. प्र. सं. कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्या दरम्यान ताब्यात घेण्यात आलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३.<br>४. | गणेश अरुण तिडके<br>पुष्पा अरुण तिडके<br>चंदा संतोष वाघ<br>संतोष भास्कर वाघ | लागू नाही | लागू नाही | भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे. | १७.०८.२०२६ | लागू नाही | लागू नाही |

## Part 'C'
## साक्षीदारांची यादी
### A. अभियोक्ता पक्ष:

| रँक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र. १ | शुभांगी संदिप विसपुते (नि.क्र. २८) | फिर्यादी |

### B. बचावाचे साक्षीदार जर असतील तरः

| रँक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### C. न्यायालयाचे साक्षीदार जर असतील तरः–

| रँक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### अभियोगपक्षाचे / बचावपक्षाचे न्यायालयीन निशाणी क्रमांकाची यादी
### A. अभियोगपक्षः–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र. ३० | फिर्यादीवरील सही |

### B. बचावपक्षः-

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

### C. न्यायालयाचे निशाणी:

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

### D. जप्त केलेले साहित्यः

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

# न्या य नि र्ण य
**(घोषीत दिनांक : १७.०८.२०२६)**

अभियोगपक्षाने प्रस्तुतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे दाखल केला आहे.

अभियोगपक्षाचे वादातील कथन संक्षिप्त स्वरुपात खालीलप्रमाणे :–

२. फिर्यादी शुभांगी गणेश तिडके हिने दिनांक १९.०७.२०२४ रोजी शिंदखेडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली की, ती आई संगिताबाई, भाऊ अमोल व मुलगा शुभ यांच्यासोबत एकत्र राहते व दिनांक २९.१०.२०१४ पासून ती शिंदखेडा एस टी डेपो येथे वाहक म्हणून नोकरी करते व त्यातून मिळणा–या उत्पन्नातून ती तिच्या परिवाराचा उदरनिर्वाह करते. दिनांक ०६.०४.२०१८ रोजी तिचा विवाह नाशिक (मखमलाबाद) येथे राहणारा आरोपी क्र. १ गणेश अरुण तिडके यांचेसोबत जाती रिवाजाप्रमाणे शिंदखेडा झाला होता. तिच्या लग्नात तिच्या भाऊने बराच खर्च केला होता. लग्न झाल्यानंतर तिला सासरच्या लोकांनी काही दिवस नाशिक मखमलाबाद येथे चांगल्या प्रकारे नांदवले व चांगली वागणूक दिली. त्यानंतर त्यांच्या स्वभावात अचानक बदल झाला व तिला नेहमी काही एक कारण नसतांना तिचे पती, सासू, नणंद व नंदोई असे टोमणे मारु लागले की, "तु गरीबची घरची आहे, नोकरी करते, तुझ्या घरच्यांनीही लग्नात आमच्या व आमच्या नातेवाईकांचा मानपान केला नाही". असे बोलून तिला नेहमी पती व सासू मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी देत, परंतु तिने हे सर्व सहन करीत संसार सुरुच ठेवला. तिने तिच्या आई व भाऊला फोन करुन सदरची हकीकत कळवली असता त्यांनी तिचे पती व सासू यांना समजावून सांगितले व काही दिवस त्यांचा संसार व्यवस्थित सुरु होता.

३. फिर्यादीने पुढे कथन केले की, बरेच काही दिवस गेल्यानंतर फिर्यादीला एप्रिल २०२० ला पहिल्या बाळासाठी दिवस गेले. त्यावेळी ती माहेरीच शिंदखेड्यात होती व लॉकडाऊन असल्या कारणाने ती माहेरीच शिंदखेडा येथे राहिली. तिची दिनांक २१.०१.२०२१ रोजी डिलीव्हरी होवून मुलगा शुभ झाला. त्यानंतर ती दोन महिने माहेरीच राहिल्यानंतर तिला पती गणेश हे नाशिक येथे घेवून गेले व परत ते एकत्र राहून संसार करु लागले. काही दिवस बरे गेल्यानंतर अचानक तिची

नणंद व नंदोई हे मुलाला पाहण्यासाठी तिच्या घरी आले असतांना त्यांनी तिचे पतीचे कान भरुन घरात भांडण घातले की, तुझी पत्नी शिंदखेडा येथे नोकरी करते व तु नाशिक येथे राहतो मग तुझ्या पत्नीला दिवस कसे काय गेलत व हे बाळ तुझे रक्ताचे नाही असे तिच्या सासूचे व पतीचे कान भरले. त्या दिवसापासून तिची सासू नेहमी याबाबत टोमणे मारुन बोलू लागली की, हे बाळ माझ्या मुलाचे नाही, तुझे बाहेर कुठेतरी लफडे असून सदरचे बाळ हे त्याचेच आहे. असे बोलून पती व सासू तिला मारहाण करुन वाईट वाईट शिवीगाळ करत. म्हणून तिने याबाबत तिच्या भाऊ व आईला सांगितले असता त्यांनी त्यांची समजूत घातली पण ते काहीएक ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. म्हणून तिला तिची आई जून २०२१ मध्ये माहेरी शिंदखेडा येथे घेवून आली. तिने भरोसा सेल, पोलीस अधिक्षक कार्यालय, धुळे येथे तक्रारी अर्ज दिला होता. त्या अर्जावरुन समुपदेशनसाठी तिचे पती व त्यांचे नातेवाईक हजर राहिले नाहीत. म्हणून फिर्यादीने शिंदखेडा पोलीस स्टेशन येथे फिर्याद नोंदविली.

४. वरील फिर्यादनुसार आरोपींविरुध्द शिंदखेडा पोलीस ठाणे गु.र.क्र. २१५/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. तपास अधिकारी पोहेकॉ/२२३ अे. बी. पवार यांनी सदरील गुन्ह्याचा तपास केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले व तपासात आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये खटला चालवण्याइतपत पुरावा असल्याने त्यांनी आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

५. मी आरोपींविरुध्द निशाणी क्र. २१ वर भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे दोषारोप ठेवला. आरोपींना दोषारोपातील मजकूर वाचून दाखविला. आरोपींनी आरोप नाकारले व संपरिक्षेची मागणी केली.

६. खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण झाले, त्या प्रत्येक मुद्यांचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, दिनांक २९.०६.२०२४ रोजी फिर्यादीचे लग्न झाल्याचे काही दिवसानंतर फिर्यादीचे माहेरी व सासरी आरोपी क्र. १ फिर्यादीचे पती, आरोपी क्र. २ फिर्यादीची सासू व आरोपी क्र. ३ फिर्यादीची नणंद व आरोपी क्र. ४ फिर्यादीचे नंदोई यांनी संगनमत करुन फिर्यादीचा छळ केला आणि तिला मानसिक व शारिरीक त्रासही दिला ? | नाही. |
| २. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, वरील नमूद केलेल्या कालावधीत व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस ईच्छापूर्वक दुखापत केली ? | नाही. |
| ३. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, वरील नमूद केलेल्या कालावधीत व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीला अश्लील भाषेत शिवीगाळ करून जाणीवपूर्वक अपमान केला आणि आरोपींना उद्देश किंवा तशी जाणीव असतांना तिला अशा प्रकारे चिथावणी दिली; ज्या चिथावणीमुळे ती सार्वजनिक शांतता भंग करेल किंवा अन्य कोणताही गुन्हा करेल ? | नाही. |
| ४. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, वरील नमूद केलेल्या कालावधीत व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देऊन गुन्हेगारी स्वरुपाची दहशत निर्माण केली ? | नाही. |
| ५. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता केली. |

## कारणमिमांसा

७. आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने फिर्यादी शुभांगी संदिप विसपुते (सा.क्र. १, नि.क्र. २८) यांना तपासले आहे.

८. न्यायालयामार्फत निशाणी क्र. १ वर दिनांक १८.०७.२०२६ रोजी आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला व अभियोग पक्षाच्या पुराव्यात

आरोपींविरुध्द पुरावा न आल्याने फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ३१३(१)(ब) चे निवेदनाशिवाय प्रकरण चालविण्याचा आदेश झाला. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ४ बाबत:–</u>**

९. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी शुभांगी संदिप विसपुते (सा.क्र. १, नि.क्र. २८) हिच्या पुराव्यात असे आले आहे की, गणेश अरुण तिडके हे तिचे पहिले पती होते, पुष्पा, चंदा आणि संतोष हे तिचे सासू, बहिण व नातेवाईक आहेत, गणेश तिडके यांच्याशी तिचा विवाह दिनांक ०६.०४.२०१८ रोजी शिंदखेडा येथे झाला होता, विवाह झाल्यानंतर ती नाशिक येथे नांदायला गेली होती, नाशिक येथे ती व तिचे पती गणेश तिडके हे राहत होते, इतर आरोपी हे ६–७ महिन्यानंतर नाशिक येथे राहण्यास आले, त्यानंतर ती आरोपी गणेश तिडके याच्यासोबत नांदली नाही, त्यानंतर ती तिच्या माहेरीच राहत होती, तिचे गणेशच्या आई व नातेवाईकांसोबत जमत नव्हते, वाद होत होते, म्हणून ती माहेरी राहत होती, तिने महिला आयोगाकडे तक्रार दाखल केली होती, त्यानंतर महिला आयोगामार्फत पोलिस स्टेशन येथे तक्रार पाठवण्यात आली. फिर्यादवर तिची सही (निशाणी क्र. ३०) असून त्यातील मजकूर आठवत नाही, तिचे दुसरे लग्न झाले आहे, तिच्या दुस–या पतीचे नाव संदिप सुरेश विसपुते असे आहे, तिचे पूर्वीचे नाव शुभांगी गणेश तिडके असे होते व या दोन व्यक्ती तिच आहे. फिर्यादी (सा.क्र. १) अभियोगपक्षास मदत करत नसल्याने अभियोगपक्षातर्फे साक्षीदाराचा उलटतपास नोंदविण्यात आला. त्यामध्ये तिने, आरोपी हे त्यांचा लग्नात मानपान केला नाही असे म्हणून तिला शिवीगाळ करत होते हे म्हणणे खरे नसल्याचे, आरोपी क्र. १ याने हाताबुक्क्यांनी तिला मारहाण करुन तिचे चारित्र्यावर संशय घेवून व आरोपी क्र. २ ते ४ यांनी संगनमताने फिर्यादीस झालेले बाळ लग्नसंबंधातून नाही असा आरोप लावून वारंवार अपमानीत करुन मानसिक व शारिरीक छळ केला हे म्हणणे खरे नसल्याचे, आरोपींनी मानसिक व शारिरीक छळ करुन तिला माहेरी टाकून दिले हे म्हणणे खरे नसल्याचे, आरोपींनी तिचा मानसिक व शारिरीक छळ केल्यामुळे तिने त्यांच्याविरुध्द फिर्याद दाखल केली होती हे म्हणणे खरे नसल्याचे कथन केले. तसेच फिर्यादीने पुढे आरोपी व तिची न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे असल्याचे कथन केले आहे.

१०. आरोपींतर्फे फिर्यादीचा उलटतपास नाकारण्यात आला.

११. एकदंरीत अभियोगपक्षाने अभिलेखावर आणलेला पुरावा पाहिला असता असे दिसून येते की, दिनांक २९.०६.२०२४ रोजी फिर्यादीचे लग्न झाल्याचे काही दिवसानंतर फिर्यादीचे माहेरी व सासरी आरोपी क्र. १ फिर्यादीचे पती, आरोपी क्र. २ फिर्यादीची सासू व आरोपी क्र. ३ फिर्यादीची नणंद व आरोपी क्र. ४ फिर्यादीचे नंदोई यांनी संगनमत करुन फिर्यादीचा छळ केला आणि तिला मानसिक व शारिरीक त्रासही दिला, आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस ईच्छापूर्वक दुखापत केली, फिर्यादीला अश्लील भाषेत शिवीगाळ करून जाणीवपूर्वक अपमान केला आणि आरोपींना उद्देश किंवा तशी जाणीव असतांना तिला अशा प्रकारे चिथावणी दिली; ज्या चिथावणीमुळे ती सार्वजनिक शांतता भंग करेल किंवा अन्य कोणताही गुन्हा करेल व फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देऊन गुन्हेगारी स्वरुपाची दहशत निर्माण केली याबाबत काहीही सांगितलेले नाही. सा.क्र. १ फिर्यादीने अभियोगपक्षाच्या कथनास दुजोरा दिलेला नाही. पुढे फिर्यादीने तिच्या पुराव्यात मान्य केले आहे की, आरोपी व तिची न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे. त्यामुळे अभियोगपक्षाने भारतीय दंड संहिता कलम ४९८(अ) चे आरोप सिध्द करण्याकरिता आवश्यक असा कुठलाही पुरावा अभिलेखावर आणलेला नाही.

१२. आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस ईच्छापूर्वक दुखापत केली याबाबत सा.क्र. १ फिर्यादी हिने कुठलेही कथन केलेले नाही. तसेच ईच्छापूर्वक दुखापत केल्यानंतर फिर्यादी हिने काही औषधोपचार घेतले याबाबत कोणताही वैद्यकीय पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे भारतीय दंड संहिता कलम ३२३ अन्वये हाताबुक्क्यांनी मारहाण केल्याबाबतच्या आरोपांची सिध्दता झालेली नाही.

१३. भारतीय दंड संहिता कलम ५०४ अन्वये आरोप सिध्द करण्यासाठी आरोपींनी संगनमत करुन शिवीगाळ करण्यासाठी वापरलेले विशिष्ट शब्द अगर वाक्य हे साक्षीदाराने सांगणे आवश्यक आहे. परंतु, सा.क्र. १ फिर्यादी हिच्या पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपींनी ज्या विशिष्ट शब्दात फिर्यादीचा शिवीगाळ करुन अपमान केला याबाबत काहीही सांगितले नाही. त्यामुळे भारतीय दंड संहिता कलम ५०४ चे आरोपांची सिध्दता झालेली नाही.

१४. भारतीय दंड संहिताचे कलम ५०६ अन्वये आरोप सिध्द करण्यासाठी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देऊन गुन्हेगारी स्वरुपाची दहशत निर्माण

केली हे साक्षीदाराने सांगणे आवश्यक आहे. परंतु फिर्यादी सा.क्र. १ यांचे पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपींनी संगनमताने फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देऊन गुन्हेगारी स्वरुपाची दहशत निर्माण केली हे पुराव्यादरम्यान सांगितलेले नाही. त्यामुळे भारतीय दंड संहिताचे कलम ५०६ चे आरोपांची सिध्दता झालेली नाही.

१५. एकंदरीत अभिलेखावर उपलब्ध पुराव्यावरुन आरोपी क्र. १ ते ४ यांनी संगनमत करुन दिनांक २९.०६.२०२४ रोजी फिर्यादीचे लग्न झाल्याचे काही दिवसानंतर फिर्यादीचे माहेरी व सासरी आरोपी क्र. १ फिर्यादीचे पती, आरोपी क्र. २ फिर्यादीची सासू व आरोपी क्र. ३ फिर्यादीची नणंद व आरोपी क्र. ४ फिर्यादीचे नंदोई यांनी संगनमत करुन फिर्यादीचा छळ केला आणि तिला मानसिक व शारिरीक त्रासही दिला, आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस ईच्छापूर्वक दुखापत केली, फिर्यादीला अश्लील भाषेत शिवीगाळ करून जाणीवपूर्वक अपमान केला आणि आरोपींना उद्देश किंवा तशी जाणीव असतांना तिला अशा प्रकारे चिथावणी दिली; ज्या चिथावणीमुळे ती सार्वजनिक शांतता भंग करेल किंवा अन्य कोणताही गुन्हा करेल व फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देऊन गुन्हेगारी स्वरुपाची दहशत निर्माण केली या निष्कर्षापर्यंत पोहचता येत नाही. याउलट सा.क्र. १ फिर्यादी हिने तिच्या पुराव्यात मान्य केले की, आरोपी व तिची न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे. परिणामी, आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये आरोप सिध्द होवू शकलेले नाहीत. म्हणून मी मुद्दा क्रमांक १ ते ४ चे नकारार्थी उत्तर नोंदविले आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ५ बाबत</u>**:–

१६. मुद्दा क्रमांक १ ते ४ चे उत्तर नकारार्थी आल्याने आरोपींची निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी मुद्दा क्रमांक ५ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

## आदेश

१. आरोपी क्र. १) गणेश अरुण तिडके, २) पुष्पा अरुण तिडके, ३) चंदा संतोष वाघ व ४) संतोष भास्कर वाघ यांची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणेच्या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१)

अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जमानतीचे बंधपत्र व जातमुचलका याद्वारे रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र द्यावयाचे आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

LOTUS P DHANVE
Digitally signed by LOTUS P DHANVE
Date: 2026.08.17 17:09:20 +0530

(एल. पी. धन्वे)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
शिंदखेडा.

दिनांक : १७.०८.२०२६.

**प्रमाणपत्र**

मी प्रमाणीत करतो की, सदर पी.डी.एफ संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | आर. एन. माळी, |
| न्यायालयाचे नांव | : | न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग यांचे न्यायालय, शिंदखेडा. |
| पीडीएफ फाईल अपलोड | : | १७.०८.२०२६. |

सही/–
लघुलेखक (श्रेणी–३)